**MHST060005172016**

## रे. दि. मु. नं. २०३/२०१६ नि १५ खालील आदेश

१. प्रतिवादी नं. १ ते ६ तर्फे विना कैफियत आदेश रदद् होवून त्यांची कैफियत अभिलेखावर घेणेसाठी अर्ज दिलेला आहे.

२. वादी तर्फे अर्जावर म्हणणे दाखल केले व अर्जाला हरकत दर्शविली.

३. प्रतिवादीचे विधिज्ञांच्या युक्तीवादानुसार प्रतिवादी हे बाहेरगावी पोटापाण्यासाठी गेल्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करु शकले नाहीत. वादीचे विधिज्ञांच्या युक्तीवादानुसार प्रतिवादी यांना कैफियत अभीलेखावर घेणेत येवू नये कारण विना कैफियत चौकशीसाठी दावा लागलेला आहे.

४. अभीलेखाचे वाचन केले असता असे दिसून ये ते की निशाणी ६ नुसार प्रतिवादी क्र. १ ते ६ यांना दिनांक २१.०१.२०१७ रोजी समन्स तामिल झाले आहे व हा अर्ज दिनांक २९.११.२०१८ रोजी दाखल झाला आहे. कैफियत दाखल करण्यासाठी हक्काचा कालावधी ३० व विवेकाधिकाराचा कालावधी ६० दिवस असे एकूण ९० दिवसांचा कालावधी समन्स तामिल झाल्यापासून प्रतिवादींना असतो. सदर प्रकरणामध्ये ९० दिवसांचा कालावधी हा २१.०४.२०१७ रोजी संपतो. त्यामुळे हा अर्ज दाखल करण्यास प्रतिवादींना जवळपास दीड वर्षाचा उशीर झालेला आहे. प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतली नाही तर दाव्याचा निर्णय हा गुणवत्तेवर होवू शकणार नाही व त्यामुळे प्रतिवादींचा हक्क सुध्दा डावलला जावू शकतो म्हणून न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादीची कैफियत झालेला उशीर माफ करुन अभीलेखावर घेणेस पात्र आहे. तसेच झालेल्या उशीराबाबत प्रतिवादी हे वादीला एकत्रीत मिळूण ५०० रुपये खर्च देणेस पात्र आहेत. त्या अनुषंगाने खालील आदेश पारीत.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज हा रक्क्म रुपये ५००/– चे खर्चाने मंजूर करणेत येतो जो प्रतिवादीने वादीला पुढील तारखेपर्यंत देणे.

२. खर्च भरल्यानंतर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घ्यावी.

दहिवडी. (आर. आर. थोरात)
दि.२०.०४.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दहिवडी.